
# १५. संदेशवहन व प्रसार माध्यमे

## सांगा पाहू !

(१) आपण दूरदर्शन संचावर अनेक वाहिन्यांचे कार्यक्रम पाहतो. ते कोठून येतात?




(२) मोबाइलवरून आपण इतरांशी बोलतो. आपले संभाषण दुसऱ्या व्यक्तीशी मोबाइलवरून कसे होत असेल?



पहिल्या पाठात आपण अवकाश प्रक्षेपण व कृत्रिम उपग्रह यांबद्दल जाणून घेतले आहे. आधुनिक पद्धतीने करायच्या संदेशवहनासाठी कृत्रिम उपग्रहांचा उपयोग केला जातो. हे संदेश अत्यंत कमी वेळात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणापर्यंत पोहचतात. उदा., (१) जगातील कोणत्याही भागात होणाऱ्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण आपण दूरदर्शन संचावर पाहू शकतो. जसे फुटबॉल, क्रिकेटचे सामने इत्यादी. (२) मोबाइलद्वारे आपण परदेशातील व्यक्तीशी थेट बोलू शकतो. (३) राष्ट्रपती व पंतप्रधान रेडिओवरून सर्व देशवासीयांसाठी एकाच वेळी भाषण/संदेश देऊ शकतात.






**अग्निबाणाच्या साहाय्याने प्रक्षेपण करून कृत्रिम उपग्रह अवकाशात सोडले जातात. त्यांचा उपयोग संदेशवहनासाठी करतात.**

## माहीत आहे का तुम्हांला ?

भारतात संदेशवहनासाठी कृत्रिम उपग्रहांचा अवलंब केला जातो. हे उपग्रह इनसॅट (INSAT - Indian National Satellite) या नावाने ओळखले जातात.


## सांगा पाहू !



वरील चित्रांचे निरीक्षण करा. चित्रांमध्ये दाखवलेल्या चेहऱ्यांवरून तुम्हांला कोणते भाव जाणवतात ते चेहऱ्यांखालील चौकटीत लिहा.

चेहऱ्यावरील भाव पाहून आपल्याला त्या व्यक्तीच्या भावना समजतात, म्हणजेच चेहऱ्यावरील भाव किंवा इतर हावभावांवरून आपल्यापर्यंत संदेश पोहचतो. संदेशवहनाद्वारे आपल्याला माहिती मिळते. माहितीची देवाणघेवाण करणे म्हणजे संदेशवहन होय. माहितीचे प्रसारण हादेखील संदेशवहनाचाच भाग आहे. माहितीचा उपयोग ज्ञाननिर्मितीसाठी होतो.

## सांगा पाहू !



सोबतच्या पृष्ठावरील चित्रांचे निरीक्षण करा. चित्रांत कोणकोणत्या प्रसारमाध्यमांचा उपयोग केला आहे ते चौकटीत लिहा.

.................................................................
.................................................................
.................................................................

वृत्तपत्रांमधून आपल्याला कोणकोणत्या प्रकारची माहिती मिळते ते नोंदवा.

- शैक्षणिक
- ------
- -----
- ---- ---
- ------
- -----

### प्रसारमाध्यमांचे चांगले परिणाम

१. आपल्यापासून दूर असलेल्या व्यक्तींशी सहज संपर्क साधता येतो.

२. माहिती मिळवण्यासाठी व देण्यासाठी लागणारा वेळ व श्रम यांत बचत होते.

३. पर्यावरण, स्त्री-पुरुष समानता, स्वच्छता इत्यादीं बाबत संवेदनशीलता वाढण्यास मदत मिळते.

४. वादळे, त्सुनामी, पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तींबाबत पूर्वकल्पना मिळू शकते.

५. आरोग्य, शिक्षण व समाजातील चांगल्या घटना तसेच प्रसंगांबाबत जागरूकता निर्माण होते.

६. लोकांसाठी राबवण्यात येणाऱ्या शासकीय योजना यशस्वी करण्यामध्ये मदत होते.

७. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण यांबाबतची जाणीव जागृती होते. त्यामुळे जीवनपद्धतीमध्ये सुधारणा होते.

८. प्रसारमाध्यमांमुळे व्यापार, उद्योगधंदे यांमध्ये वाढ होते.

### प्रसारमाध्यमांचे हानिकारक परिणाम

१. दूरदर्शन, संगणक, मोबाइल यांच्या अति वापरामुळे डोळ्यांचे तसेच पाठीचे व श्रवणाचे आजार होतात. मनोविकार, एकलकोंडेपणा वाढणे इत्यादी त्रासही संभवतात.

२. दूरदर्शन वाहिन्या, इंटरनेट यांद्वारे अनेक प्रकारची माहिती मिळते. माहितीचा दुरुपयोग करून समाजाची शांतता व स्वास्थ्य बिघडवण्याचे प्रकार घडतात.

३. प्रसारमाध्यमांवरील विविध कार्यक्रम पाहण्यात वेळ घालवल्याने मैदानी खेळ, शारीरिक क्षमता यांकडे दुर्लक्ष होते. याचा विपरीत परिणाम शारीरिक स्वास्थ्यावर होतो.

### काय करावे बरे ?



पाचव्या इयत्तेत शिकणारा आमोद शाळेतून घरी आला, की नेहमी संगणकावर वेगवेगळी संकेतस्थळे पाहतो. टीव्हीवरील आवडते कार्यक्रमही न चुकता बघतो. आईच्या मोबाइलवर गेम खेळतो. सारखा घरात बसून असतो. हल्ली त्याला भूक कमी लागते. झोपही जास्त येते. त्याचे वजनही खूप वाढले आहे.



आमोदच्या आईला त्याची फार काळजी वाटते आहे. ती कशी दूर होईल ?

### हे नेहमी लक्षात ठेवा.



संदेशवहन व माहिती प्रसारण साधनांचा तारतम्याने वापर करावा. त्यांचा अतिरेक होणार नाही याची काळजी घ्यावी.

## माहीत आहे का तुम्हांला ?



दृक्-श्राव्य संदेशवहन – दूरध्वनी किंवा मोबाइलवरून इतरांशी बोलताना आपण एकमेकांना पाहू शकत नाही. माहिती प्रसारणाच्या नवीन तंत्रामुळे मोबाइलवर आता हे शक्य झाले आहे. त्यामुळे दुसऱ्या व्यक्तीशी संभाषण करताना आपण तिला पाहू शकतो.

## आपण काय शिकलो ?



- संदेशवहन साधनांची ओळख.
- संदेशवहनाकरिता अवकाश प्रक्षेपणाचे तंत्र.
- प्रसारमाध्यम साधनांची ओळख.
- प्रसारमाध्यमांचे फायदे व तोटे.

## स्वाध्याय

**१. प्रसारमाध्यमांचे शैक्षणिक उपयोग लिहा.**

**२. दूरध्वनीच्या वापरापूर्वी संदेश पाठवण्यासाठी कोणत्या साधनांचा वापर केला जात असे ?**

**३. संगणकामुळे तुमच्या जीवनात कोणता फरक पडला ?**

**उपक्रम**

१. दूरदर्शन संचावरील वेगवेगळ्या वाहिन्यांमधून तुम्हांला कोणकोणती माहिती मिळते ती खालीलप्रमाणे तक्ता करून वहीत लिहा.

| अ.क्र. | वाहिनीचे/ चॅनेलचे नाव | कार्यक्रमाचे नाव | उपयोग |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |

२. आकाशवाणी केंद्राला भेट देऊन त्या ठिकाणी होत असणाऱ्या कामकाजाबाबत माहिती घ्या.

३. नॅशनल जिओग्राफी, डिस्कव्हरी, ज्ञानदर्शन इत्यादी वाहिन्यांवरील शैक्षणिक कार्यक्रमांची वर्गात चर्चा करा.

* * *